# निधन वार्ता

## लीलाबाई पाटील ; आज अंत्ययात्रा



**जळगाव । प्रतिनिधी।** येथील आदर्श नगरमधील रहिवासी श्रीमती लीलाबाई रूपा पाटील (वय ८४) यांचे दि. १९ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि. २० रोजी सकाळी ८ वाजता त्यांचे राहतेघरुन निघेल. त्यांच्या पश्चात दिलीप, कैलास, विलास, अनिल चार मुले व विमलबाई, कल्पना दोन मुली, जावाई व सुना नातवंडे असा परिवार आहे.

## मयूर संजय पाटील



**फैजपूर । प्रतिनिधी ।** आमोदा ता.यावल येथील रहिवासी मयूर संजय पाटील (वय २८) यांचे दि.१७ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, आई, बहीण असा परिवार आहे. ते संजय पाटील यांचा मुलगा तर पंकज पाटील, रुपेश पाटील यांचा पुतण्या होत.

## अशोक महाजन



**लासूर ता.चोपडा । वार्ताहर।-** येथील रहिवाशी अशोक भगवान महाजन यांचे दि. १९ रोजी दुपारी २.३५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परीवार असून ते दिलीप भगवान महाजन यांचे लहान बंधू होत.

## पोपट तुकाराम नारखेडे



**फैजपूर । प्रतिनिधी।-** आमोदा ता.यावल येथील पोपट तुकाराम नारखेडे (वय ८८) यांचे दि.१८ रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुली, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. ते अशोक नारखेडे, मोहन नारखेडे व किशोर नारखेडे यांचे काका होत.

## कैलास ताथू महाजन



**लासूर ता.चोपडा। वार्ताहर।** येथील रहिवाशी कैलास ताथू महाजन यांचे दि. १८ रोजी दुपारी १२.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, सुन असा परीवार असून ते राजेश कैलास महाजन यांचे वडील होत.

## भवरलाल दरगड



**भुसावळ । प्रतिनिधी ।** येथील गायत्री नगर भागातील रहिवासी भवरलाल रामनिवास दरगड (वय ७५) यांचे शुक्रवार दि. १८ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते घनश्याम दरगड यांचे पुतणे तसेच बद्रीनारायण व द्वारकाप्रसाद दरगड , यांचे मोठे भाऊ व निलेश दरगड़ यांचे वडिल होत.

# मुलाच्या निधनाच्या पाठोपाठ आईनेदेखील घेतला जगाचा निरोप

■ **पारोळा । प्रतिनिधी**



दैव माणसाची कसोटी घेते हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे आता पुन्हा पारोळा येथे ५९ वर्षाच्या मुलाच्या निधनाच्या तीव्र धक्क्याने आईने देखील मुलाच्या निधनाच्या चौथ्या दिवशी या जगाच्या निरोप घेतला.

११ एप्रिल रोजी टोरा टोरा ड्रेसेसचे मालक जगदीश पंडितराव पाटील यांचे निधन झाले. २०१८ मध्ये सकाळी फिरायला जात असताना अज्ञात मोटरसायकलने धडक दिल्याने जगदीश पाटील डोक्याला मार लागून गंभीर जखमी झाले तेथून ते ११ एप्रिलपर्यंत तब्बल आठ वर्ष ते कोमात होते. शेवटी त्यांची प्राणजोत मालवली. गुणी मुलगा कर्तबगार मुलगा अशा दुःखद प्रसंगाने सोडून गेल्याने आईलाही अति दुःख झाले त्यानंतर चौथ्या दिवशी सुभद्राबाई पंडितराव पाटील या अति दुःख वेगाने त्यांना हृदयाच्या तीव्र झटक्याने त्यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झाले.

मुला पाठोपाठ आईने देखील या जगाचा निरोप घेतल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## वत्सलाबाई मावळे ; आज अंत्ययात्रा



**ऐनपुर ता. रावेर । वार्ताहर।** येथील वत्सलाबाई वसंत मावळे (वय ८२) यांचे दि. १९ रोजी दु. ३ वाजेला वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंतयात्रा रविवार, दि.२० रोजी सकाळी ९:३० वाजेला राहत्या घरून ऐनपुर येथून निघणार आहे. त्या वसंतराव मावळे यांच्या पत्नी तर सेवानिवृत्त पोलिस हवालदार पुंडलिक मावळे यांच्या वहिनी व ज्ञानेश्वर मावळे आणि मंदाकिनी सोनोने यांच्या आई होत. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सुन, मुलगी, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे.

## कृष्णा पोतदार

**सोनगीर । वार्ताहर ।** येथील एन. जी. बागुल हायस्कूलचे क्रीडा शिक्षक कृष्णा वसंत पोतदार (वय ५४) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने धुळ्यात निधन झाले. प्रमोद नगर, देवपूर येथे ते वास्तव्यास होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.

# कर्जबाजारी शेतकऱ्याची अहिरवाडीत आत्महत्या

■ **रावेर । प्रतिनिधी**



अहिरवाडी (ता. रावेर) येथील कर्जबाजारी शेतकऱ्याने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. विलास युवराज चौधरी विलास चौधरी (वय ४०, रा. अहिरवाडी) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. मयत विलास चौधरी शेतात गेल्याचे घरी सांगून गेले होते, सायंकाळी ते परत आले नाहीत, म्हणून त्यांचा शोध घेतला असता,अहिरवाडी शिवारातील स्वतःच्या शेतातील विहिरीत उडी घेऊन त्यांनी आत्महत्या केल्याचे आढळले. सतत नापिकीमुळे, तसेच त्यांच्या नावावर केऱ्हाळे येथील युनियन बँकेचे दोन लाख रुपये कर्ज आहे. यामुळे त्यांनी आत्महत्या केल्याचे त्यांच्या नातेवाइकांनी सांगितले. त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे. याबाबत निळकंठ चौधरी यांनी दिलेल्या माहितीवरून रावेर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली आहे. पोलिस तपास करीत आहेत.

# मुलांच्या जडणघडणीत आईचे स्थान महत्त्वाचे - आरती चौधरी

■ **थोरगव्हाण । वार्ताहर ।**



थोरगव्हाण येथील डि. एस. देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, थोरगव्हाण येथे सुरु असलेल्या उन्हाळी संस्कारमाला शिबिराच्या पाचव्या पुष्पात मुलांच्या शालेय जडणघडणीत आईचे स्थान या विषयावर मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या सौ. आरती सारंग चौधरी, समुपदेशक व समाजसेविका (भुसावळ) यांनी आईच्या भूमिकेचे महत्व स्पष्ट करताना सांगितले की, आई हीच मुलांची पहिली गुरू असते. तिच्या सान्निध्यात संस्कार रुजतात. घरातील वातावरण व आईचे विचार मुलांच्या शालेय यशात मोठी भूमिका बजावतात. आईच्या सेवेचे ऋण आपण कधीच फेळू शकत नाही. आईच्या न्यायालयात बाळाचे लेकरांचे सर्व गुन्हे माफ होतात. आईचे ऐका, म्हणणे टाळू नका मोठे व्हा. राजमाता जिजाऊ यांनी आदर्श शिवरायांना घडवले हे उदाहरण देवून विद्यार्थ्यांना सांगितले. मातृहृदयी सानेगुरूची आईच्या संस्कारामुळे घडले तेव्हा विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले.

अध्यक्षस्थानी सदाशिव बालकराम झांबरे, (माजी सरपंच गाते) व शाळेचे माजी विद्यार्थी (१९८० बॅच) होते. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आईच्या मार्गदर्शनामुळेच मुलामध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. आजही ग्रामीण भागातील मातांचा मुलांच्या घडणीत मोठा वाटा आहे. आईचा महिमा व्यक्त करतांना सदाशिव झांबरे यांनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली. सभागृहात भावनिक वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनींच्या स्वागतगीताने झाली. सरस्वती पूजन अध्यक्ष झांबरे यांच्याहस्ते पार पडले. प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापक डी. के. पाटील यांनी केले. प्रमुख पाहुण्यांमध्ये सौ. सरिता गणेश पाटील (लोकनियुक्त सरपंच, गाते). सारंग व्ही. चौधरी (आर्किटेक्ट, भुसावळ) व गणेश पाटील यांचा समावेश होता. वक्त्यांचा परिचय सौ. जे. पी. चौधरी यांनी करून दिला. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत चौधरी व संचालक. रविंद्र काशिनाथ चौधरी यांची यावेळी उपस्थिती लाभली मनोगत व्यक्त केले. आभार प्रदर्शन प्रभारी मुख्याध्यापक डी. के. पाटील यांनी केले.

पान १ वरुन ...

## ठाकरे बंधूंचे मनोमिलन?

व्हावे लागले. शिवसेनेतील फुटीची पुनरावृत्ती राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झाली. गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस, उद्धव ठाकरे आणि शरद पवार गटाने बाजी मारली. परंतु, विधानसभा निवडणुकीत या तिघांचेही पानिपत झाले. मनसेला पक्ष स्थापनेनंतर प्रथमच भोपळा सुद्धा फोडता आला नाही. विधानसभेत १३२ जागा जिंकून भाजप मोठा पक्ष ठरला असून आता राज्याचे संपूर्ण राजकारण आणि सत्ताकारण भाजपाभोवती केंद्रित झाले आहे. आता मुंबई महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यासमोर अस्तित्व राखण्याचे मोठे आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव आणि राज ठाकरे यांनी एकत्र येण्याचे सुतोवाच जाहीरपणे केले आहे.

## आम्ही एकत्र येणे कठीण नाही -राज

माझा विचार आहे. शिवसेनेत असताना उद्धवबरोबर काम करायला मला काहीच हरकत नव्हती. आता समोरच्याच्या (उद्धव) मनात आहे का, त्यांच्याबरोबर मी काम करावे?... महाराष्ट्राची इच्छा असेल तर महाराष्ट्राने जाऊन सांगावे, असे सांगत लहान-मोठ्या गोष्टीत आपण अहंकार आणत नाही, असे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले.

## महाराष्ट्राच्या हिताच्या गोष्टी करा -उद्धव

राज ठाकरे यांच्या युतीच्या प्रस्तावावर बोलताना उद्धव ठाकरे यांनी अट घातली. महाराष्ट्र हिताच्या आड जो कोणी येईल त्याचे स्वागत मी करणार नाही. त्याला मी घरी बोलावणार नाही, त्याच्या घरी मी जाणार नाही, त्याचा आदर, स्वागत त्याच्या पंगतीला मी बसणार नाही, हे पहिले ठरवा आणि मग महाराष्ट्र हिताच्या गोष्टी करा,असे उद्धव ठाकरे म्हणाले. तसेच सर्व मराठी माणसांनी ठरवायचे आहे की, भाजपसोबत जायचे की माझ्यासोबत म्हणजे शिवसेनेसोबत...पण एसंशि, गद्दार सेनेशी नाही. तसेच कोणाबरोबर जाऊन महाराष्ट्राचे, मराठीचे आणि हिंदुत्वाचे हित होणार आहे ते आधी ठरवा, असे आवाहनही ठाकरेंनी उपस्थित शिवसैनिकांना केले. मग जो काही पाठिंबा द्यायचा की विरोध करायचा तो बिनशर्त करा. माझी काहीच हरकत नाही. फक्त महाराष्ट्र हित हीच माझी एकच शर्त आहे. बाकीच्या चोरांना कळत-नकळत पाठिंबा किंवा त्यांचा प्रचार करायचा नाही, अशी छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेऊन टाळी देण्याची हाळी द्यायची, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## बनावट पनीर निर्माण करणाऱ्यांना दणका

माहिती व संदेश प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. तसे न करता ग्राहकांची फसवणूक केली जात असेल तर आता एफडीए कठोर कारवाई करणार आहे.

ग्राहकाच्या हिताचे रक्षण करण्याकरिता रेस्टॉरंट, हॉटेल, कॅटरर्स व फास्ट फूड आस्थापनांवर बारीक लक्ष ठेवले जाणार आहे. यामध्ये पनीर ऐवजी चीन ऍनालॉगचा वापर होत असल्यास त्याबाबतच्या घटक पदार्थांची माहिती इलेक्ट्रॉनिक ऑर्डर मशीन, इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्ड, मेनू कार्ड इत्यादींवर नमूद करणे आवश्यक आहे. या पृष्ठभूमीवर सर्व संबंधित अधिकाऱ्यांना व्यावसायिकांचे खरेदी बिल्स तपासून कोणतीही फसवणूक किंवा दिशाभूल आढळल्यास सखोल तपासणी करुन अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नियम व नियमन २०२२ तसेच अन्न सुरक्षा व मानके (अन्न व्यावसायिक परवाना व नोंदणी) नियमन २०११ मधील तरतुदींनुसार तात्काळ परवाना निलंबन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| २४-०२-२०२५ ०१-०३-२०२५ | ४४७-५७-२६९ | ३६७-६५-२६७ | १३६-०६-४५७ | १८०-९७-१७९ | २७०-९३-३३७ | ६९०-५३-१२० |
| ०३-०३-२०२५ ०८-०३-२०२५ | ७७८-२१-५८८ | ४६०-०१-६६९ | ५५८-८०-६७७ | ३००-३९-२८९ | १२९-२०-४६० | ३७०-०१-१२८ |
| १०-०३-२०२५ १५-०३-२०२५ | ७८९-४९-५६८ | १२५-८९-४६९ | ३६९-८३-१५७ | १५६-२९-१८० | ● | १३०-४४-७८९ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | ५५८-८२-७७८ | २४४-०१-२९० | ५७९-१४-३४७ | १२०-३३-७८८ | १६०-७०-६७७ | ८८०-६६-२७७ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १११-३३-१३९ | ६७७-००-३३४ | ४७०-१०-५५० | ८९०-७९-२८९ | २५७-३४-१५५ | २३४-९६-५५६ |
| ३१-०१-२०२५ ०५-०१-२०२५ | १२८-१२-३३६ | ४६०-०४-३५६ | ८८०-६६-३६७ | १७८-६१-५६० | १६९-६२-१३८ | २३५-०२-६७९ |
| ०७-०४-२०२५ १२-०४-२०२५ | १८०-९१-५८८ | २४७-३६-२६८ | ७८९-४४-२३९ | २७७-६३-६७० | ३४५-२३-२३८ | ४६९-९३-६८९ |
| १४-०४-२०२५ १९-०४-२०२५ | २५७-४०-३८९ | २७०-९६-२६८ | १६९-६२-५७० | ५५८-८०-२२६ | ४८९-१५-१६८ | |

### मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २४-०२-२०२५ ०१-०३-२०२५ | २६६-४७-४५८ | ३५९-७५-४५६ | ६९०-५०-३८९ | २६७-५९-४६९ | ५६९-०७-३५९ | ३४०-७८-२६० | ● |
| ०३-०३-२०२५ ०८-०३-२०२५ | २४७-३७-६६८ | ११५-७८-४६८ | १३५-९६-१२३ | २३०-५२-१५६ | ५७८-०२-२३७ | २६०-८१-४७० | ● |
| १०-०३-२०२५ १५-०३-२०२५ | २३९-४४-२४८ | ६७८-१३-१४८ | ३४५-२९-१४४ | ७७०-४२-२५५ | ● | १४९-४७-२७८ | ● |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १२०-३६-११४ | ५७९-१२-५८९ | ३८८-९५-१७७ | १३८-२८-४७७ | ३५९-७९-१२६ | ५८८-१३-६७० | ● |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १३८-२८-२६० | ७८८-३७-२५० | ३४६-३८-१७० | १६०-७१-३८० | १४८-३४-३५६ | १४५-०३-६७० | ● |
| ३१-०१-२०२५ ०५-०१-२०२५ | ४५५-४५-१५९ | ६७०-३६-३६७ | २३६-१९-४६९ | ६८८-२६-४४८ | ८८९-५४-३५६ | १२०-३४-५९० | ● |
| ०७-०४-२०२५ १२-०४-२०२५ | ३६६-५१-२९० | २४७-३१-११९ | १५०-६१-४८९ | १४९-४०-४७९ | ४४६-४२-११० | १६९-६६-११४ | ● |
| १४-०४-२०२५ १९-०४-२०२५ | ६६७-९७-३७७ | १८०-९२-२४६ | ३४७-४४-१५८ | १५७-३८-४५९ | ४५०-९१-१३७ | | ● |

### मिलन नाईट

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| २४-०२-२०२५ ०१-०३-२०२५ | ३७०-०५-४४७ | ३५८-६३-२३८ | ५५६-६५-२३० | २५०-७९-२७० | ३८८-९४-६९९ | ११८-०३-२३८ |
| ०३-०३-२०२५ ०८-०३-२०२५ | १२६-९५-४५६ | १२४-७०-२४४ | ३३०-६७-८९० | ५७८-०९-३७९ | २३७-२६-६०० | ३६९-८९-५६८ |
| १०-०३-२०२५ १५-०३-२०२५ | ४६७-७८-४५९ | ४५८-७८-४७७ | ३७९-९३-३४६ | ३४९-६९-३७९ | ● | ४९०-३१-१४६ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | ४६७-७७-२६९ | ११३-५१-३८० | ५५८-८२-१५६ | ४४०-८९-२७० | ४५६-५५-४५६ | १२५-८५-१६८ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | २९९-०२-३४५ | १९९-९०-३७० | ११२-४६-३४९ | १३८-२१-५६० | ३४५-२३-१३९ | ११६-८८-३५० |
| ३१-०१-२०२५ ०५-०१-२०२५ | २४७-३७-१७९ | ६९०-५१-१३७ | ३३७-३३-२४७ | १२०-३७-४४९ | २००-२३-२४७ | २६०-८४-२३९ |
| ०७-०४-२०२५ १२-०४-२०२५ | २८०-०९-२३४ | ८८०-६५-६९० | ४५७-६१-३८० | १२९-२५-६९० | ८८०-६४-१५८ | ५९०-४५-१७७ |
| १४-०४-२०२५ १९-०४-२०२५ | ३६९-८०-३३४ | ५६८-९३-१५७ | १६०-७६-२६८ | १७०-८७-१६० | | |


## CHANGE OF NAME

I HAVE CHANGED MY NAME FROM KAJAL SUNIL ATHWANI TO DIAARA NITIN JHAMNANI AFTER MARRIAGE. I RESIDES NEAR RADHE BHAVAN,SINDHI COLONY,BHUSAWAL.DIST-JALGAON (CM)

I HAVE CHANGED MY NAME FROM AYYUB KHAN TO AYUBKHA PATHAN AS PER DOCUMENT (CM)

I HAVE CHANGED MY NAME FROM FIROJ KHAN TO FIROZ KHAN MUSA KHAN AS PER DOCUMENT (CM)

## CHANGE OF NAME

I HAVE CHANGED MY NAME FROM MOHAMMAD IMTIYAZ TO MOHAMMAD IMTIYAZ ABDUL RAHMAN AS PER DOCUMENT(CM)

I HAVE CHANGED MY NAME FROM AHAMAD RAHAMAN TO ABDUL RAHAMAN HIDAYATULLAH SHAIKH AS PER DOCUMENT(CM)

I HAVE CHANGE MY NAME FROM VINOD KANHAILAL SANGTANI TO VINOD KANHAIYALAL SANGTANI,ADDRESS: P NO. 15, SHIVRAM NAGAR, NR VIVEKANAND SCHOOL, JALGAON -425001,DIST: JALGAON AS PER AFFIDAVIT, (CM)

अशोक DOLBY DIGITAL (एअरकंडिशन में)



आजसे रोजाना १२, ३, ६ व ९ बजेसे भव्य शुभारंभ, जबरदस्त एक्शन, हॉरर एवं डरावनी फिल्म जिसे देखकर आपके रोंगटे खडे हो जाऐंगे।

आॅदेला-२

(टिप - BMS पर online बुकींग शुरु है)

# क्लासिफाईड

## पाहिजेत

हेअर कटींग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहीजेत. न्हावी समाजाच्या गरिब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीक पासुन ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यन्त मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवनाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहणाऱ्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

## खरेदी विक्री

जळगाव शहर परिसरात व जिल्ह्यात, प्लॉट, शेत, फ्लॅट, दुकान, घर, बंगला इ. खरेदी विक्रीसाठी व भाड्याने देणे घेण्यासाठी विश्वासनीय ठिकाण स्वामीकृपा ईस्टेट ब्रोकर जळगाव. आमच्याकडे सुंदर लोकेशन व दर्जेदार क्वॉलिटीचे बांधकाम असलेले गच्चीताबा बंगलोज, स्वस्त भावाच्या, जिरायत, बागायत, रोडटच, एन.ए. झोन शेतजमिनी विकणे आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

## उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकून गुनिया, जुनाट अॅलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो.नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही.एम./ ०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00505)

गुरुवार १७/०४/२०२५
मेन बाजार -१३६-०३-७७९
मिलन ना.-१७०-८७-१६०

शुक्रवार १८/०४/२०२५
मेन बाजार -
कल्याण-४८९-१५-१६८
मिलन डे -४५०-९१-१३७
मिलन ना.-

## दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे अॅडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्णः- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... अॅडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२६)(CRINV-2425JL/CRG00504)

## १००% व्यसनमुक्ती

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी.डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२,www.drpalve nashamuk tikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही.एम./०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00503)

जाहिरात छोटी किमया मोठी

## छोटी जाहिरात संकलन केंद्र

जळगाव शहरात देशदूततर्फे छोट्या जाहिरातदारांचा सोयीसाठी खालीलठिकाणी छोटी जाहिरात संकलन केंद्र सुरु करण्यात आले आहे. तरी छोट्या जाहिरातदारांनी त्याचा लाभ घ्यावा.
**क्रिविक अॅड.**-३७६ जय किसनवाडी, जीएस ग्राउंडसमोर, जळगाव, मो.९६७३७७७१२२.
**व्ही.एम.स्पेस** - एफ.१५, दुसरा मजला, गोलाणी मार्केट, ०२५७-२२४०७१०, ३२९२३७३, मो.९३७०१९७११०.
**चंचल कम्युनिकेशन** - दौलत नगर, मोहाडी रोड, मो. ९४२३९५४४६०, ९४०३४८२८९६.
**मल्हार कम्युनिकेशन** - मेहरुण तलाव परिसर, सेंट टेरेसा स्कूल मागे, जळगाव मो. ९३७००७७३१२
**ईश्वर अॅड एजन्सी** - २३ दिनानाथवाडी, रिंगरोड. ०२५७-२२२९७००, मो.९४२२२०४६३३, ९४२२७७६४८८.
**रुपाली अॅड.**- बी-७, दुसरा मजला, रॉयल ट्रॅव्हल्सच्यावर, गोलाणी मार्केट, जळगाव. मो.७५०७७७७७०४.
**लकी अॅड.** - जिजाऊ नगर, जळगाव. मो. ९३२५३५६४४९
**मुदंडा अॅड.** - १७९, नवीपेठ, ०२५७- २२३६७७५. मो.नं. ९८९०६७३८२०.
**श्रेयस अॅड.**-सी-१५२, पहिला मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. मो.९८६०८४९०४८.
**गणपती अॅड.** - गट नं.५८/७, प्लॉट नं. २/२, रुबी बिल्डिंग मागे, लक्ष्मीनारायण नगर, अयोध्यानगरजवळ, जळगाव. मो. ९८२३०२१०३३.
**यश अॅड.**- न्यू.बी.जे.मार्केट जळगाव मो.८७९३१३२८१५.
**गोपाळकृष्ण अॅड.**- कोयल निवास, श्रध्दा कॉलनीजवळ, जळगाव. मो. ८८३०८१८६७६.
**नेवे अॅड.**-रामभाऊ जोशी मार्केट, जळगाव मो.९८२३०१५६०३
**ओम अॅड.**-सी-२९/३४, दुसरा मजला गोलाणी मार्केट, जळगाव मो. ९४२३१७५३४९

देशदूत
---------- सूचना ----------
वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.